संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५१३/२०२२
सरकारी वि. शोभाबाई शिवाजी बाटुंगे
निशाणी ९ वर पुढे
C.N.R. No. MHJG0300 1211 2022

## न्यायनिर्णय

**( दिनांक ०९ ऑगस्ट, २०२३ रोजी अधिघोषित )**

**०१.** अभियोग पक्षाचे कथन, साक्षीदारांची साक्ष, दाखल झालेले दस्तावेज, आरोपीचा बचाव आणि दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले व त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे कारणमिमांसेसह नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक १३.०४.२०२२ रोजी सायंकाळी १८.३० वाजता, अमळनेर शहरात बहादरपुर रोड कंजरवाडा भागात घराच्या आडोशाला सार्वजनिक ठिकाणी, आरोपी तीचे ताब्यात बेकायदेशिर रित्या गावठी हातभट्टीची दारु बाळगली आणि तिची चोरटी विक्री केली ? | ..... नकारार्थी ..... |
| २. | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**०२.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी एका साक्षीदाराची साक्ष नोंदविली. साक्षीदार क्र.१ - पंच आप्पा तानकु पाटील व साक्षीदार क्र.२ - पंच संजय जगन्नाथ पाटील यांची साक्ष नोंदविली. त्यात पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही, तसेच त्यांना काहीही माहित नसल्याचे कथन केल्यामुळे, इतर साक्षीदारांना तपासून काहीही निष्पन्न होऊ शकणार नव्हते. म्हणून निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद

करण्यात आला. आरोपीविरुध्द सकृतदर्शनी पुरावा मिळून न आल्यामुळे त्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) अन्वयेचे निवेदन वगळण्यात आले. अभिलेखाचे अवलोकन करण्यात आले. दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

## मुद्दा क्र.१ करीता :-

**०३.** वरील साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दोन्ही पंच साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही. तसेच अभियोग पक्षाला वारंवार संधी देऊनसुध्दा अभियोग पक्षाने इतर स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष नोंदविली नाही. या प्रकरणात अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल सादर केला आहे. परंतु, पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षाला सहकार्य केले नसल्यामुळे सदर अहवाल हा आरोपीच्या ताब्यातूनच पंचनामा करुन जप्त केलेला मुद्देमाल आहे किंवा काय ही बाब संशयापलीकडे जाऊन सिध्द होत नाही.

**०४.** फौजदारी न्यायशास्त्राप्रमाणे आरोपीवर ठेवलेला दोषारोप समंजस संदेहाच्या पलीकडे जाऊन सिध्द करणे आवश्यक आहे. तसेच अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्यात समंजस संदेह दिसून आल्यास त्याचा पुरेपूर फायदा बचाव पक्षाला देणे क्रमप्राप्त आहे. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने आरोपीच्या ताब्यातूनच तथाकथित मुद्देमाल पंचनाम्यान्वये जप्त केला असे समंजस संदेहाच्या पलीकडे जाऊन सिध्द केले नाही. त्यामुळे आरोपीवरील महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) चा दोषारोप समंजस संदेहाच्या पलीकडे जाऊन सिध्द झाला नाही. सबब मुद्दा क्र.१ चे उत्तरार्थ माझे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

## मुद्दा क्र.२ करीता :-

**०५.** वरील विवेचनान्वये आरोपीला समंजस संदेहाचा फायदा देऊन निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त आहे. करीता मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५१३/२०२२
सरकारी वि. शोभाबाई शिवाजी बाटुंगे
निशाणी ९ वर पुढे
C.N.R. No. MHJG0300 1211 2022

**आदेश**

१. आरोपी शोभ शिवाजी बाटुंगे (कंजर) याची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये, महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) खालील शिक्षापात्र गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे पूर्वीचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने निकटतम अपिल न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी न्यायनिर्णयापूर्वी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ प्रमाणे रुपये १५,०००/- चा वैयक्तिक जातमुचलका बंधपत्र द्यावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

SWATI SURESHRAO JONDHALE
Digitally signed by SWATI SURESHRAO JONDHALE
Date: 2023.10.19 13:39:18 +0530

(एस.एस.जोंधळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, २ रे न्यायालय,
अमळनेर, ता.अमळनेर, जि.जळगांव.

अमळनेर.
दि. ०९.०८.२०२३